**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री जनधन योजनेला आज एक दशक पूर्ण/ प्रधानमंत्र्यांनी केलं लाभार्थ्यांचं अभिनंदन

- खरीप पेरणीखालच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ

- राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाच्या महासंचालकपदी वरिष्ठ आयपी◌ेएस अधिकारी श्रीनिवासन यांची नियुक्ती

- १७ व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि अंतराळभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूची १ सुवर्ण आणि ४ रौप्यपदकांची कमाई

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**<><><><><>**

प्रधानमंत्री जनधन योजनेला आज ‘एक दशक’ पूर्ण झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २८ ऑगस्ट २०१४ रोजी, ही योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ५३ कोटी जनधन खाती उघडण्यात आली आहेत. या योजनेच्या दशकपूर्ती निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाभार्थ्यांचं अभिनंदन केलं असून ही योजना यशस्वी केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. आर्थिक समावेशन आणि महिला – युवकांचं, सक्षमीकरणाच्या प्रयत्नांमधे जनधन योजनेचा महत्त्वाचा वाटा असल्याचं, मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. हा जगातला सर्वात मोठा ‘वित्तीय समावेशन उपक्रम’ असून, अर्थ मंत्रालय, यामाध्यमातून उपेक्षित आणि

आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आधार देण्याचा प्रयत्न सातत्यानं करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशात खरीप पिकांचा पेरा यंदा वाढला आहे, लागवडीखालचं एकूण क्षेत्र १ हजार ६५ लाख हेक्टरपेक्षा जास्त असून तुलनेनं गेल्या वर्षी याच कालावधीत अंदाजे १ हजार ४४ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी झाली होती. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागानं खरीप पिकांच्या पेरणीचा अहवाल प्रसिद्ध केला, त्यात ही माहिती देण्यात आली आहे. या अहवालानुसार भाताचं पेरणी क्षेत्र ३९४ लाख २८ हजार हेक्टरवर पोहोचलं असून गेल्या वर्षीच्या याच कालावधीत हे क्षेत्र ३७८ लाख ४ हजार हेक्टर इतकं होतं. तर कडधान्याचं क्षेत्र गेल्या वर्षी ११५ लाख ५५ हजार हेक्टर होतं ते यंदा १२२ लाख १६ हजार हेक्टर झालं आहे. भरडधान्य पिकांची पेरणी यंदा १८५ लाख ५१ हजार हेक्टरवर झाली आहे, जी गेल्यावर्षी १७७ लाख ५० हजार हेक्टरवर झाली होती. तसंच तेलबियांच्या उत्पादनातही वाढ झाली असून,१८८ लाख ३७ हजार हेक्टरवर तेलबिया पिकांची पेरणी झाली आहे.

**<><><><><>**

एनटीएफ अर्थात राष्ट्रीय कृती दलाची दुसरी बैठक आज दूरदृष्यप्रणालीमार्फत होत आहे. या बैठकीचं अध्यक्षस्थान केंद्रीय गृह सचिव आणि केंद्रीय आरोग्य सचिव संयुक्तपणे भूषवणार असून सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक बैठकीत सहभागी होतील. वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी तात्काळ करण्याच्या उपाययोजनांविषयी चर्चा होणार आहे. राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक काल कॅबिनेट सचिवांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झाली. या बैठकीत विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा झाली असून कृती दलाच्या सदस्यांनी आपली

मतं मांडली. वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्या संदर्भात तीनशे ते चारशे सूचना मिळाल्याचं कृती दलाच्या सदस्यांनी सांगितलं. कें**द्रीय आरोग्य मंत्रालयानं ‘Suggestions to NTF’ नावाचं पोर्टल तयार केलं असून त्यावर सूचना मागवल्या आहेत.**

**<><><><><>**

संयुक्त संसदीय समितीने वक्फ सुधारणा विधेयक २०२४ वर जनता, एनजीओ, तज्ज्ञ आणि संस्थांकडून मतं आणि सूचना मागवल्या आहेत. लोकसभा सचिवालयाच्या प्रसिद्धीपत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. लेखी सूचना इंग्रजी किंवा हिंदी भाषेत jpcwaqf-lss@sansad.nic.in या संकेतस्थळावर पाठवाव्यात असं सचिवालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. तसंच **संयुक्त सचिव, लोकसभा सचिवालय, रूम क्रमांक ४४०, संसद भवन, नवी दिल्ली** या पत्त्यावरही सूचना पाठवता येतील असं सांगण्यात आलं आहे. या सूचना पंधरा दिवसांच्या आत पाठवायच्या आहेत. या सूचना गोपनीय ठेवल्या जातील तसंच समितीकडून त्यांची नोंद घेतली जाईल.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. यंदा देशभरातील ५० शिक्षकांना या पुरस्कारांनं सन्मानित करण्यात येणार आहे; यात महाराष्ट्रातल्या दोन शिक्षकांचा समावेश आहे. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील आदिवासीबहुल जाजावंडी इथल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक मंतय्या बेडके; तसंच कोल्हापुरातील स. म. लोहिया माध्यमिक शाळेतील कलाशिक्षक सागर बगाडे यांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या पाच सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

<><><><><>

राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाच्या महासंचालकपदी भारतीय पोलीस सेवेतले वरिष्ठ अधिकारी श्रीनिवासन यांची नियुक्ती झाली आहे. श्रीनिवासन हे १९९२च्या तुकडीतले बिहार कॅडरचे अधिकारी असून सध्या ते राजगीर इथल्या बिहार पोलीस अकादमीचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. मंत्रिमंडळ नियुक्ती समितीनं त्यांच्या नेमणुकीवर शिक्कामोर्तब केलं असून त्यांचा कार्यकाळ ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत राहील.

<><><><><>

१७व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि अंतराळभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूनं १ सुवर्ण आणि ४ रौप्यपदकांना गवसणी घातली आहे. १७ ते २६ ऑगस्टदरम्यान ब्राझिलची राजधानी रिओ दी जानेरो इथं झालेल्या या स्पर्धेत बंगळुरूचा दक्ष तयालिया यानं सुवर्ण, तर पुण्याचे आयुष कुठारी आणि सानिध्य सराफ, हैदराबादचा बानीब्रत माजी आणि बिहारचा पाणिनी या चौघांनी रौप्यपदकाची कमाई केली. पदकतालिकेत भारत आठव्या स्थानी राहिला.

<><><><><>

दिव्यांगांसाठीच्या पॅरालिंपिक स्पर्धेला आजपासून पॅरीस इथं सुरुवात होत आहे. या स्पर्धा येत्या ८ सप्टेंबर पर्यंत चालणार आहेत. एकूण २२ क्रीडाप्रकारांचा स्पर्धेत समावेश असून त्यातल्या १२ खेळांमधे भारताचा ८४ जणांचा संघ सहभागी होणार आहे. आतापर्यंतचा हा सर्वात मोठा पॅरालिंपिक संघ आहे. पॅरा सायकलिंग, पॅरा ज्युडो आणि पॅरा रोइंग या प्रकारांत प्रथमच भारतीय क्रिडापटू आपलं कौशल्य अजमावणार आहेत.

<><><><><>

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे विद्यमान सचिव जय शाह यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद - ICC च्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्षपदासाठी शहा हे एकमेव उमेदवार होते. यावर्षी १ डिसेंबर रोजी ते आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारतील. ३५ वर्षांचे शाह, हे पद भूषवणारे सर्वात तरुण उमेदवार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात राजकोट इथला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी पुतळ्याचे शिल्पकार जयदीप आपटे आणि बांधकाम सल्लागार डॉ. चेतन पाटील यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नौदलाच्या दोन अधिकाऱ्यांनी काल मालवणला भेट देऊन पहाणी केली. या पुतळ्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागानं २० ऑगस्ट रोजी नौदलाला पत्र लिहून पाऊस आणि खाऱ्या वाऱ्यांमुळं पुतळ्याची जोडणी गंजल्याची बाब अधोरेखित केली होती. दरम्यान या प्रकाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीनं आज मालवण बंदची हाक दिली आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल मध्ये भाजपानं आज जाहीर केलेल्या 'बंदला' संमिश्र प्रतिसाद मिळत आहे. नुकत्याच झालेल्या 'नबन्ना अभिजन' आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या कथित अत्याचाराच्या निषेधार्थ आज भाजपानं बंगाल मध्ये 'बंदची हाक' दिली होती. दरम्यान, कोलकत्यात तुरळक प्रमाणात वाहतूक सुरु असून दुकानं तसंच शाळा, महाविद्यालयं चालू असल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

देशातल्या २२ राज्यांमध्ये आज मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे. राजधानी दिल्लीसह महाराष्ट्र, जम्मू-

कश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, मध्य प्रदेश, बिहार, झारखंड, ओडिशातला काही भाग तसंच गोवा, कर्नाटक आणि केरळ इथल्या अनेक ठिकाणी आज ‘यलो अलर्ट’ जारी केला आहे. तर ईशान्येच्या राज्यांमध्ये ‘उद्या’ यलो अलर्ट जारी केला आहे. गेले काही दिवस गुजरातमधे जोरदार पाऊस सुरु असून यात आत्ता पर्यंत सात जणांचा मृत्यू झाला आहे. सखल भागातल्या सुमारे पंधरा हजार पेक्षा अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. गुजरात आणि राजस्थानमध्ये अनेक ठिकाणी पूर स्थिती उद्भावली असून अनेक गावांमधे पाणी शिरलं आहे.

//<><><><><><>//